पुनर्रचित हवामान आधारीत फळ पीक विमा योजनेमध्ये सन २०१७-१८ साठी फळपिक विमा हप्ता अनुदानापोटी राज्य हिस्सा मंजूर अनुदानाच्या ७०% मृग व आंबिया बहाराकरीता निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन पुरकपत्र क्रमांक :- पुरक-२०१७/प्र.क्र.१७२/१३-अे,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- २३ फेब्रुवारी, २०१८

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक पुरक-२०१७/प्र.क्र.१७२/१३-अे, दि. २४/१/२०१८.

शासन पुरकपत्र:-

संदर्भाधिन शासन निर्णयान्वये पुनर्रचित हवामान आधारीत पीक विमा योजनेमध्ये सन२०१७-१८ साठी फळपिक विमा हप्ता अनुदानापोटी राज्य हिस्सा रक्कम रु.४३३.२६ कोटीच्या एकूण ७०% निधी रु. ३०३.२८ कोटी मृग व आंबिया बहाराकरीता निधी वितरीत करणेत आलेला आहे. सदर शासन निर्णयात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

२. प्रधानमंत्री फसल बीमा योजनेच्या मार्गदर्शक सूचनेतील मुद्या क्रमांक VIII (३) (b) मध्ये नमूद केल्यानुसार केंद्र शासनाचे पॅनेलवरील खाजगी विमा कंपन्यांना भारतीय कृषि विमा कंपनी (Agriculture Insurance Company of India) (AIC) मार्फत विमा दर अनुदान वितरित करणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे भारतीय कृषि विमा कंपनीने खाजगी विमा कंपन्यांकडून प्राप्त झालेल्या अनुदान मागणीची पडताळणी करुनच संबंधित विमा कंपन्यांना अनुदान वितरीत करावयाचे आहे. सबब, उपरोक्त नमूद विमा कंपन्यांना वितरीत करावयाचा निधी, प्रचलित नियमांतील सर्व अटींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून,तसेच देय रक्कमेची योग्य परीगणना व छाननी करुन भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत उपलब्ध करुन देण्यास शासन मान्यता देत आहे.

३. प्रस्तुत खर्च सन २०१७-१८ च्या मागणी क्रमांक डी-३,२४०१ पीक संवर्धन,(००) ११०(दोन) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना,राज्य योजना (००) (०७) हवामान आधारीत फळपिक विमा योजना (२४०१ ९४०२),योजनांतर्गत ३३ अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली उपलब्ध तातूदीतून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी वित्त विभागाच्या परिपत्रकातील सूचनांचे पालन करुन खर्च करण्यात यावा. यासाठी आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महारराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच सहाय्यक संचालक, (लेखा १), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी सदर रक्कम जिल्हा कोषागार कार्यालय,पुणे येथून आहरित करुन वरील परिच्छेद २ मध्ये नमूद केलेल्या भारतीय कृषि विमा कंपनीस दर्शविल्याप्रमाणे बॅकेच्या खाती संवितरीत करावी.

५. सदर शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेला निधी तात्काळ उपाययोजना होण्याच्या हेतूनेच कोषागारातून आहरीत करावा आणि अंमलबजावणी यंत्रणांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या निधीचा तात्काळ विनियोग करावा. तसेच अंमलबजावणी यंत्रणांनी सदर निधी उपयोजनाविना बॅक खात्यामध्ये ठेवू नये.

सदर शासन पुरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१८०२२३१५२२११२२०१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Chandrakumar Vithal Ghaytadak

Digitally signed by Chandrakumar Vithal Ghaytadak
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=034948ccd1f6b6c67380c817b34a9af75fcfa679a4609321f9da27d9ab87b0d1, cn=Chandrakumar Vithal Ghaytadak
Date: 2018.02.23 15:23:20 +05'30'

(चं.वि.घायतडक)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त कृषी, कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.
२. संचालक फलोत्पादन, कृषी आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे,
३. सहाय्यक संचालक,(लेखा), कृषी आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे,
४. सर्व संचालक, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे,(व्दार, संचालक फलोत्पादन, पुणे,)
५. सर्व विभागीय कृषी सहसंचालक, (व्दार, संचालक फलोत्पादन, पुणे,)
६. सर्व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, (व्दार, संचालक फलोत्पादन, पुणे,)
७. महालेखापाल-१/२, (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई /नागपूर,
८. महालेखापाल-१/२ , (लेखा परीक्षा) मुंबई /नागपूर,
९. वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी,पुणे.
१०.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
११.सहसंचालक लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई -३२,
१२.भारतीय कृषि विमा कंपनी,स्टॉक एक्सचेंज टॉवर,२० वा मजला (ईस्ट विंग), दलाल स्ट्रीट, मुंबई-२३.
१३.बजाज एलायन्झ जनरल इन्शुरन्स कंपनी,जीई प्लाझा, एअरपेर्ट रोड,येरवडा,पुणे-४१०००६.
१४.रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनी, ५७० रेक्टी फायर हाऊस, वडाळा वेस्ट, मुंबई - ३१
१५.इफको टोकियो जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, रुरल ॲन्ड को- ऑपरेशन डिपार्टमेंन्ट ४-था मजला, प्लॉट क्र-३ सेक्टर २९, गुरगाव हरियाणा -१.
१६.एचडीएफसी एर्गो जनरल इन्शुरन्स कंपनी, १ ला मजला, एचडीएफसी हाऊस, एच.टी. पारेख मार्ग, १६५-१६६ बॅकबे रिक्लमेशन, चर्चगेट, मुंबई - ४०००२०
१७.अवर सचिव, कार्या-१४८१, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१८. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), कृषि व पदुम (कृषि व फलोत्पादन) विभाग, मंत्रालय,मुंबई.
१९.कक्ष अधिकारी (पदुम-१६), कृषि व पदुम (कृषि व फलोत्पादन) विभाग, मंत्रालय,मुंबई.
२०.निवड नस्ती (१३-अे)